**मुंबई, दि.27 जुलै 2016**

**जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब का?**

**- एकनाथराव खडसे**

मुंबई, दि.27 जुलै- जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आज विद्यार्थ्यांना दोन दोन नव्हे, तर सहा सहा महिने कार्यालयात चकरा माराव्या लागतात. रक्ताच्या नातेसंबंधाशी असलेल्या पाल्यास जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असताना सुद्धा प्रमाणपत्र मिळण्यास विलंब का लावला जातो ? असा सवाल करीत भाजपाचे ज्येष्ठ सदस्य तथा  माजी मंत्री एकनाथराव खडसे यांनी सरकारला काल विधान सभेत चांगलेच धारेवर धरले.

खडसे म्हणाले की, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्याकरिता जर एखाद्या उमेदवाराने अर्ज केला असेल आणि त्याच्या रक्तातील नात्याच्या व्यक्तीने जात पडताळणी करून घेतली असेल, तर अर्जदार उमेदवारास तातडीने जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. असा निर्णय राज्य शासनाने घेतलेला असताना सुद्धा आणि कायदा करून देखील सरकार त्याची अंमलबजावणी का करीत नाही? असा सवालही खडसे यांनी केला.

अर्जदार विद्यार्थयाला त्याने जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यानंतर त्याचा अर्ज पडताळणीच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती तात्काळ मिळावी यासाठी संबंधित सॉफ्ट वेअरमध्ये सुधारणा करा, अशी मागणीही खडसे यांनी यावेळी केली.

यावर उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले  यांनी सांगितले की,या संदर्भातील निर्णयाची अधिसूचना आठ दिवसात काढण्यात येईल. तसेच या निर्णयाची अंमलबजावणी कारण्यासाठी तातडीने सूचना देण्यात येतील आणि या साठी लागणारा कर्मचारी वर्ग देखील तातडीने भरण्यात येईल. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार जात पडताळणी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास आणि त्याच्या रक्ताच्या नात्यातील एका व्यक्तीचा जात पडताळणी दाखला असेल,तर अशा उमेदवारास पंधरा दिवसात जात प्रमाणपत्र मिळण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, असे सामाजिक न्यायमंत्री बडोले यांनी स्पष्ट केले.